# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः15.02.2025** **वारःशनिवार**

---

1. अमेरिकेचा यशस्वी दौरा आटोपून पंतप्रधान मायदेशी परतले.
2. 26/11च्या मुंबई हल्ल्यातील मुख्य आरोपी तहव्वूर राणा याच्या प्रत्यार्पणाला अमेरिकेची मंजूरी
3. केंद्रिय गृहमंत्री अमित शहा यांनी घेतला राज्यातल्या नव्या गुन्हेगारी कायदा अंमलबजावणीचा आढावा
4. 44 वं मराठवाडा साहित्य संमेलन आज आणि उद्या वाळूज इथं होणार आणि
5. 38 व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचा समारोप, महाराष्ट्राला सर्वाधिक पदकं.

**पंतप्रधान अमेरिका दौरा**

भारत आणि अमेरिका यांनी 2030 पर्यंत द्विपक्षीय व्यापार 500 बिलियन डॉलर्सपर्यंत नेण्याचा निर्णय घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काल वॉशिंग्टन इथं संयुक्त पत्रकार परिषद घेतली. या परिषदेत पंतप्रधान मोदी यांनी ही माहिती दिली. दोन्ही देशांमधली धोरणात्मक भागीदारी यापुढेही सुरूच राहील असं त्यांनी सांगितलं. दोन्ही देशांच्या संरक्षण क्षेत्रातल्या 10 वर्षांच्या नव्या कराराची घोषणा यावेळी करण्यात आली. मुक्त, शांततापूर्ण आणि समृद्ध हिंद प्रशांत सागर क्षेत्रासाठी दोन्ही देशांमधले घनिष्ठ संबंध महत्त्वाचे आहेत याचा दोन्ही नेत्यांनी पुनरुच्चार केला.

आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या दृष्टीनं महत्त्वाची असलेली भारत मध्य पूर्व युरोप आर्थिक मार्गिका उभारण्यासाठी एकत्र काम करण्याला दोन्ही देशांनी सहमती दर्शवली असून अमेरिका भारताचा आघाडीचा तेल आणि नैसर्गिक वायू पुरवठादार देश असेल असं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी जाहीर केलं.

दहशतवादाविरोधातील लढ्यात भारत आणि अमेरिका खंबीरपणे एकमेकांसोबत उभे आहेत असं सांगून सीमेपलिकडील दहशतवाद संपवण्यासाठी ठोस कारवाई आवश्यक असल्यावर दोन्ही देशांचं एकमत झाल्याचं मोदी म्हणाले.

दरम्यान, 26/11 च्या मुंबई हल्ला प्रकरणातला मुख्य आरोपी तहव्वूर राणा याला कायदेशीर कारवाईसाठी भारताच्या ताब्यात देण्याच्या अमेरिकेच्या घोषणेचं मोठ्या प्रमाणात स्वागत झालं. तहव्वूर राणाच्या प्रत्यार्पणाबाबत प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.......

दरम्यान, अमेरिकेच्या यशस्वी दौऱ्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी नवी दिल्लीत पोहोचले आहेत.

**अमित शहा नवे गुन्हेगारी कायदे**

केंद्रिय गृहमंत्री अमित शहा यांनी काल नवी दिल्लीत नव्या गुन्हेगारी कायद्यांच्या राज्यातल्या अंमलबजावणीबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली. नव्या कायद्यांच्या आणि पोलिस, तुरुंग, न्यायालय, खटला तसंच न्यायवैद्यकशास्त्र यांच्याशी संबंधित नव्या तरतूदींच्या राज्यातल्या अंमलबजावणीचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला आणि अन्य वरीष्ठ अधिकारी बैठकीला उपस्थित होते. देशातील नागरिकांना जलद आणि पारदर्शक न्यायव्यवस्था प्रदान करण्यास सरकार वचनबद्ध आहे असं अमित शहा यावेळी म्हणाले. कायदा आणि सुव्यवस्था मजबूत करण्यासाठी गुन्ह्यांची नोंदणी होणं आवश्यक असून एफआयआर दाखल करण्यात कोणताही विलंब होता कामा नये, असे निर्देश त्यांनी दिले.

राज्य पोलिस दलाच्या 90 टक्के कर्मचाऱ्यांना नव्या कायद्याचं प्रशिक्षण देण्यात आलं असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी या बैठकीनंतर वार्ताहरांशी बोलताना दिली. सात वर्षांपेक्षा जास्त जुन्या खटल्यांच्या तपासासाठी राज्य सरकारनं 27 न्यायवैद्यकशास्त्र व्हॅन्स तैनात केल्याचं सांगून मुख्यमंत्री म्हणाले.....

**<u>सक्षम महोत्सव तटकरे</u>**

सौरऊर्जेचा जास्तीत जास्त वापर, दैनंदिन वापरात इंधनाची बचत याद्वारे भविष्यात ऊर्जा सुरक्षा, शाश्वत विकास आणि पर्यावरण संरक्षणाचं उद्दिष्ट गाठता येईल, असा विश्वास महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी व्यक्त केला. पर्यावरण संरक्षण जनजागृतीसाठी मुंबईत आयोजित केलेल्या संरक्षण क्षमता महोत्सवाचं उद्घाटन काल अदिती तटकरे यांच्या हस्ते झालं, त्यावेळी त्या बोलत होत्या. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय आणि राज्य शासनानं एकत्रितपणे हा महोत्सव आयोजित केला आहे.

येत्या 28 फेब्रुवारीपर्यंत या महोत्सवाअंतर्गत तेल विपणन कंपन्या, पर्यावरण संवर्धनाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी राज्यभरात मोहीम राबवणार आहेत. यामध्ये इंधन कार्यक्षम तंत्रज्ञान आणि पद्धतींचा अवलंब करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी विविध इंधन संवर्धन उपक्रम राबवण्यात येणार आहेत. तसंच सायक्लोथॉन, वॉकेथॉन, चित्रकला स्पर्धा, इंधन कार्यक्षम ड्रायव्हिंग स्पर्धा अशा विविध उपक्रमांच्या माध्यमातून इंधन बचतीचा संदेश दिला जाणार आहे.

**<u>मराठवाडा साहित्य संमेलन</u>**

44 वं मराठवाडा साहित्य संमेलन आज आणि उद्या वाळूज इथं होणार आहे. संमेलनाच्या उद्घाटनाला छत्रपती संभाजी नगरचे पालकमंत्री संजय शिरसाठ, आणि मंत्री अतुल सावे उपस्थित राहणार आहेत. ज्येष्ठ लेखक डॉ. भीमराव वाघचौरे या संमेलनाचे अध्यक्ष आहेत.

आज संमेलनात सामाजिक अस्वस्थते मागील खदखद जातीची की मातीची, यावर विशेष परिसंवाद होणार असून डॉ. साहेब खंदारे डॉ. मुस्तजीप खान, डॉ. राजेंद्र गोणारकर डॉ. दुष्यंत कटारे इत्यादी यात सहभागी होणार आहेत. याशिवाय या संमेलनात विविध सामाजिक विषयांवरचे परिसंवाद, काव्यवाचन, कथाकथन, लेखकाची मुलाखत इत्यादी कार्यक्रम होणार आहेत.

**<u>स्वच्छता</u>**

स्वच्छता ही केवळ एका व्यक्तीची किंवा संस्थेची जबाबदारी नसून ती लोकचळवळ आहे; लोकांनी ठरवलं तर मुळा मुठा नदी नक्की स्वच्छ राहू शकते असा विश्वास पुणे महापालिकेच्या उपायुक्त आशा राऊत यांनी व्यक्त केला. My River My Valentine या संकल्पने अंतर्गत पुण्यात काल स्वच्छता अभियान राबवण्यात आलं; त्यावेळी त्या बोलत होत्या......

केंद्रीय संचार ब्यूरो, Worship Earth Foundation आणि पुणे महानगरपालिका, यांनी संयुक्तपणे या स्वछता अभियानाचं आयोजन केलं होतं. केंद्रीय संचार ब्यूरोचे उपसंचालक निखिल देशमुख यांच्यासह विविध स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, कलाकार, नेहरू युवा केंद्रासह NSS चे विद्यार्थी आणि नागरिक यामधे मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**<u>पिफ</u>**

चित्रपटांना आणि मनोरंजन क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी आणि राज्यात चित्रपट क्षेत्राचा विकास व्हावा यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करत असल्याचं दादासाहेब फाळके चित्रनगरीच्या व्यवस्थापकीय संचालिका स्वाती म्हसे-पाटील यांनी सांगितलं. त्यासाठी विविध योजना तयार करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामध्ये, 'मराठी चित्रपट आणि शासनाचं सहकार्य' या विषयावर काल म्हसे-पाटील यांच्याशी विनोद सातव यांनी संवाद साधला, त्यावेळी त्या बोलत होत्या.

**नक्षल आत्मसमर्पण- गडचिरोली**

राज्य शासनानं सुमारे 38 लाख रुपयांचं बक्षीस जाहीर केलेल्या तीन जहाल नक्षल्यांनी काल गडचिरोली पोलिसांपुढे आत्मसमर्पण केलं. विक्रम तुलावी, नीलाबाई उईके आणि वसंती हिडामी अशी आत्मसमर्पण केलेल्या नक्षल्यांची नावं आहेत. विक्रमवर आणि नीलाबाईवर प्रत्येकी 16 लाख रुपये तर वसंती हिडामी हिच्यावर 6 लाख रुपयांचं बक्षीस सरकारनं जाहीर केलं होतं.

**राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा**

38 व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेची काल एका विशेष सांस्कृतिक समारंभानं सांगता झाली. उत्तराखंडमधल्या हल्दवानी इथं झालेल्या या समारंभाला केंद्रिय गृहमंत्री अमित शहा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अशा स्पर्धांच्या यशस्वी आयोजनातून देशाची क्रीडा संस्कृती सुदृढ होत आहे असं शहा यावेळी म्हणाले. 2036 मध्ये ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धांचं यजमानपद भूषवण्यासाठी भारत वचनबद्ध असून यासाठी देश पूर्णपणे सज्ज आहे असं शहा यांनी सांगितलं. 39 व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा मेघालयमध्ये होतील अशी घोषणा त्यांनी यावेळी केली. या स्पर्धेत लष्कराच्या संघानं सर्वाधिक 68 सुवर्णपदकं जिंकून पदकतालिकेत प्रथम क्रमांकाचं स्थान मिळवलं. महाराष्ट्रानं 54 सुवर्णपदकांसह एकंदर 201 पदकं जिंकत पदकतालिकेत दुसरं स्थान मिळवलं. महाराष्ट्राची एकंदर पदकसंख्या सर्वात जास्त आहे.

**हवामान**

राज्यात आज सर्वत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.